महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सांख्यिकी शाखा
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई -400 008
दूरध्वनी क्र.23023900 वेबसाईट : www.msrtc.gov.in फॅक्स क्र.23012308

---

क्र. राप / सांख्यिकी / 62 दिनांक : 15.01.2016

**विभाग नियंत्रक**
म.रा.मा.प.महामंडळ,
औरंगाबाद / बीड /जालना / लातूर / नांदेड/ ऊस्मानाबाद / परभणी / मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / भंडारा / चंद्रपूर / नागपूर /वर्धा / गडचिरोली / कोल्हापूर / पुणे / सांगली / सातारा / सोलापूर / अहमदनगर / धुळे / जळगांव / नाशिक / अकोला / अमरावती / बुलढाणा / यवतमाळ.

**( विभागिय वाहतुक अधिकारी यांचे वैयक्तिक अवलोकनार्थ )**

**विषय - ई.टी.आय.एम. प्रणाली मधील टप्पानिहाय व फेरीनिहाय प्रवासी गणना अहवालाबाबत.**

दिनांक 30.11.2015 रोजी पुणे येथे झालेल्या सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, विभाग नियंत्रक व यंत्र अभियंता चालक यांचे बैठकीत फलनिष्पत्तीवर चर्चा करताना बहुतांश विभाग नियंत्रक यांनी मुंबई प्रदेशाकडून लांब पल्याच्या फेऱ्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या असून त्याचा विपरीत परिणाम इतर विभागाच्या पुर्वीपासून चालनात असलेल्या व प्रस्थापित फेऱ्यांवर होत असल्याचे नमुद केले. या विषयाच्या अनुषंगाने मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व लांब पल्याच्या व मध्यम लांब पल्याच्या फेऱ्यांचा प्रवासी संख्येचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने ई.टी.आय.एम.प्रणालीतून नव्याने अहवाल विकसित करण्याबाबत सुचित केलेले होते.

सदर बाब विचारात घेऊन निर्णय प्रक्रीया सुलभ होण्यासाटी ई.टी.आय.एम.प्रणाली मध्ये टप्पानिहाय आणि फेरीनिहाय प्रवासी गणना अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सदर अहवाल हा ई.टी.आय.एम.प्रणालीच्या डेटा रेंज रिपोर्ट या मेनूमधुन उपलब्ध होतो. यामध्ये बस प्रकार, ट्रीप कोड तसेच ठराविक कालावधी (दिनांकापासून ते दिनांकापर्यंत ) टाकल्यास सदर कालावधीचा फेरीनिहाय, सेवा प्रकार निहाय व थांबे निहाय प्रवाशांची संख्या उपलब्ध होते.

तरी सदर ई.टी.आय.एम.मधील उपलब्ध प्रणालीचा वापर करुन विभागातील लांब पल्ला, मध्यम लांब पल्ल्याच्या फेऱ्यांचा टप्पानिहाय व फेरीनिहाय प्रवासी गणना अहवाल उपलब्ध करुन त्याबाबत आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी जेणेकरुन रा.प. महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

**मुख्य सांख्यिकी अधिकारी**

प्रादेशिक व्यवस्थापक, म.रा.मा.प.महामंडळ, औरंगाबाद / मुंबई / नागपूर /पुणे /नाशिक / अमरावती यांना माहितीसाठी.

**मुख्य सांख्यिकी अधिकारी**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**सांख्यिकी शाखा**
**महाराष्ट्र वाहतूक भवन , डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८**

टेलीफोन क्रमांक : ०२२२३०२३९०० वेबसाईट : www.msrtc.gov.in फॅक्स क्रमांक : ०२२२३०१२३०८

---

परिपत्रक क्र. ७/२०१६.
क्र.राप/सांख्यिकी/ ४०६ दिनांक : ०१.०४.२०१६

**प्रादेशिक सांख्यिकी अधिकारी**
म.रा.मा.प.महामंडळ
औरंगाबाद / मुंबई / नागपूर / पुणे / नाशिक / अमरावती

**विभागीय सांख्यिकी अधिकारी**
म.रा.मा.प.महामंडळ,
औरंगाबाद / बीड /जालना / लातूर / नांदेड/ उस्मानाबाद / परभणी / मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / भंडारा / चंद्रपूर / नागपूर /गडचिरोली /वर्धा / कोल्हापूर / पुणे / सांगली / सातारा / सोलापूर / अहमदनगर / धुळे / जळगांव / नाशिक / अकोला / अमरावती / बुलढाणा / यवतमाळ.

**विषय - वाहतूक खाते परिपत्रक क्र.७/२०१६ -**
**"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे अपघात सहायता निधी योजना ".**

**संदर्भ - वाहतूक खात्याचे पत्र क्र. २४९७ दिनांक ३१ मार्च २०१६.**

संदर्भित पत्रान्वये सदरची योजना दिनांक १.४.२०१६ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या बाबत आकारणी करावयाचे शुल्क इत्यादीबाबत सविस्तर सूचना संदर्भित परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या आहेत.

लेखा खात्यातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी या बाबत चर्चा केली असता प्रवाशांकडून आकारणी करुन संकलित होणाऱ्या रक्कमेबाबत लेखाशिर्ष क्र.५७२ मध्ये सदरचा निधी होणार आहे. सदर बाब विचारात घेता पुढील सूचनेपर्यंत **चालनिय उत्पन्न म्हणून घेण्यात येऊ नये.**

**मुख्य सांख्यिकी अधिकारी**